# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०८/०२/२०२३ (बुधवार)

---

## खुन करून प्रेतास दफन करून विल्लेवाट लावणा—या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन सावनेर :—** अंतर्गत संकेत लॉज सावनेर. दिनांक ०५/०२/२०२३ मधील मिसींग ईसम नामे रितेश मधुकर इंगोले वय ३२ वर्षे रा. सावनेर हयाची मिसींग रिपोर्ट ची चौकशी दरम्यान मिसींग इसमाचे मोबाईल फोन चा एसडीआर/सीडीआर काढला असता मिसींग इसम नामे —रितेश मधुकर इंगोले व केवल सुखदेव कोठे वय २५ वर्षे रा. सावळी तह. काटोल यांचे संभाषणावरून केवल सुखदेव कोठे यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता, दिनांक ३०.०१.२०२३ रोजी ११.०० ते २३.४५ वा. यातील मयत दिलीप चंदन ढेरावत, वय ४५ वर्ष रा. वाई ता. काटोल हल्ली मुक्काम कोराडी झोपडपट्टी धंदा जडीबूटी यास नमुद **आरोपीतांनी कट रचून संगनमताने सावनेर येथील संकेत लॉज येथे जडीबूटी घेण्याचे बहाण्याने बोलावून खंडणी उकळण्याकरीता बळजबरीने आरोपींनी आणलेल्या अर्टीका गाडीत जबरीने बसवून रोंडने गाडीत हातबुक्क्यांनी मारहाण करून तसेच गंगाडोह येथील शिवारात निर्जनस्थळी नेवून पुन्हा हातबुक्क्यांनी व काठीने मारहान करून जिवानीशी ठार मारले. मृतकाची ओळख पटू नये म्हणून प्रेतास दफन करून परस्पर विल्हेवाट लावली** .

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सर तर्फे पोलीस उपनिरीक्षक श्री व्यकंटेश दोनोडे पो. स्टे सावनेर मो न ९१४६६२५५३२ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी नामे— १) केवल सुखदेव कोठे वय २५ वर्ष रा. सावळी ता .काटोल २) सचिन अशोकराव डहाट रा. सावळी ता. काटोल ३) अब्दुल मंजमील अब्दुलईम खान रा. काटोल यांचे विरूध्द कलम ३६४(अ), ३८६, ३०२, २०१, १२०(ब), ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन सदर गुन्हयातील आरोपी क्र १ ते ३ यांना अटक करण्यात आली आहे. तसेच फरार आरोपी नामे— १) रितेष मधुकराव इंगोले रा. सावनेर २) अजय पंजाब गीर सोलंकी, रा. वाई ता. काटोल ३) सुरज विजयसिंग बैस,(ठाकुर), वय २७ वर्ष रा. काटोल यांना शोध सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री नागवे. मो न ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

## वादविवाद करून गळ्यावर चाकु मारून खुन

**पोलीस स्टेशन काटोल :—** अंतर्गत मौजा फल्ली मार्केट येथील देशी दारू दुकान जवळ काटोल १ किमी पुर्व. येथे दिनांक ०७.०२.२३ चे ११.३० वा. ते १२.१० वा. दरम्यान, यातील फिर्यादीचा भाउ मृतक नामे— आकाश अशोक सावरकर वय २८ वर्षे रा. शनि चौक, काटोल जि. नागपूर हा फल्ली मार्केट येथील देशी दारूचे दुकानासमोर गेला असता, तिथे आरोपी हा आला दोघांमध्ये **कोणत्यातरी कारणावरून वादविवाद झाल्याने यातील आरोपी याने त्याचे जवळील चाकुने मृतकाचे गळ्यावर मारून जखमी करून त्याचा खुन केला आहे.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्रीमती रूचीका राकेश सोनटक्के वय ३० वर्ष रा. शनी चौक काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी नामे— शैलेश लाड रा.खंतें लेआउट काटोल यांचेविरूध्द कलम ३०२ भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास — पोलीस निरीक्षक श्री महादेव आचरेकर मो.८३८००७२२११ हे करीत आहे.

## अपघातात जखमी

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— अंतर्गत रेल्वे चौकी नागमंदिर खापरखेडा १ किमी पश्चिम. यातील फिर्यादी हे दिनांक ०७/०२/२०२३ चे १८/३० ते १९/०० वा दरम्यान **आपले दुकान बंद करून दुकानाच्या विरुद्ध दिशेने रोड क्रॉस करून किराणा घेण्याकरिता दुकानात जात असता, रेल्वे चौकी नाग मंदिर खापरखेडा कडून एका अज्ञात वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादीला धडक मारून जखमी केले. त्यामुळे फिर्यादीच्या डोक्याला, डाव्या खांद्याला, उजव्या पायाला मार लागला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— नारायण गोविंद दास वैष्णव ७४ वर्ष रा. कोटाडे आयटीआय जवळ दहेगाव. ९६६५१२१७६१ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम २७९, ३३७, भादवी सह कलम १८४ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री जाधव मो नं. ९९२३१०४३१० हे करीत आहे.

## घरफोडी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— अंतर्गत मौजा प्रभाग ०७ पारशिवनी ०१ किमी पूर्व. येथे फिर्यादी हि घराचे दरवाज्याला लॉक लावुन भजनाचे कार्यक्रमाला बाहेर गेली असता **कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या घराचे किचन रूमचे खिडकिचे काच फोडुन लोखंडी सळाखीने मागील दरवाजाचे कळी उचकवुन घरामध्ये प्रवेश करून बेडरूम मध्ये असलेल्या लोखंडी कपाटाचे लॉकर तोडुन लॉकरमध्ये ठेवलेले नगदी १०,०००/ रू व सोन्या चांदीचे दागीने किंमती १,८१,०००/ रू असा एकुण १,९१,०००/ रू.चा माल** दिनांक ०६/०२/२३ चे सकाळी २०/३० वा. ते दि ०७/२/२३ चे ००/३० वा.दरम्याण चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सौ नलु नामदेव भुजाडे वय ५० वर्ष रा.प्रभाग ०७ पारशिवनी जिल्हा—नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५७, ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पो उप नि नागूलवार मो ९९२३३७२६४७ हे करीत आहे.

## रेल्वेमधुन खाली पडुन मृत्यु

**पोलीस स्टेशन बेला** :— अंतर्गत मौजा चिमनाझरी शिवार १२ किमी पश्चिम. यातील मृतक नामे— सुरेश कोदु इवने वय ४० वर्ष रा बासपानी त जि बैतुल मध्यप्रदेश हा फिर्यादी मित्रासोबत वारंगल वरून बैतुल येथे स्वर्ण जंयती निजामुददीन एक्सप्रेस रेल्वे ने प्रवास करीत असतांना मौजा चिमनाझरी शिवार येथे मृतक हा लघवी करीता जात असतांना **रेल्वेतुन खाली पडुन जखमी होउन जागीच मरण पावला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— बबलु इंदल इंगळे रा.बारापाणी बैतुन मध्य प्रदेश यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे १७४ जाफौ चा मर्ग नोंद करण्यात करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा सतेंद्र रंगारी मोन ८९७५६०४२८८ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**